# विभाग प्रमुख,पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

डॉ. एस. डी. चव्हाण
विभाग प्रमुख

दूरध्वनी क्र. ०७२४-२२५६००१
ई-मेल :hdahdspdkv@gmail.com


जा.क्र./विप्र/पसंदुशा/दरपत्रक/ 62 /२०२३ दिनांक:-१७/०४/२०२३

दरपत्रक

प्रति,

____________________

____________________

विषय:-पशुखाद्य खरेदी करणेकरिता पशुखाद्याचे (ConcentrateCattleFeed) दर पुरविनेबाबत ...

वरील विषयाला अनुसरून आपणास या दरपत्रकाद्वारे कळविण्यात येते कि, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या विभागातील दुधाळ जनावरांसाठी पशुखाद्य खरेदी करावयाचे आहे. सदर पशुखाद्य पुरवठा करण्याकरिता आपण इच्छुक असल्यास पशुखाद्य दराचे दरपत्रक बंद लिफाफ्यात विभाग प्रमुख,पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे नावे दि. २७/०४/२०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत पोहचतील या बेताने पाठवावेत/आणून द्यावेत. लिफाफ्यावर "पशुखाद्य पुरवठा करण्याचे दर" असे ठळक अक्षरात नमूद करावे. विहित तारखेनंतर कोणतेही दरपत्रक कार्यालयात स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. सदर दरपत्रके मा. विभाग प्रमुख यांचे दालनात गठीत समिती समक्ष दि. २७/०४/२०२३ रोजी सायंकाळी ५.४५ वाजता उघडण्यात येतील.

| अक्र | विवरण | दर प्रति क्विंटल (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| १. | पशुखाद्य (ConcentrateCattleFeed) | दर प्रति क्विंटल प्रमाणे नमूद करावे | |

नियम व अटी:

1. दरपत्रक विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे नावे सादर करावे व लिफाफ्यावर "पशुखाद्य पुरवठा करण्याचे दर" असा स्पष्ट उल्लेख करावा.
2. विहित नमुन्यातील दरपत्रक कार्यालयीन वेळत स. १०.०० ते सा. ५.३० वाजेपर्यंत बंद पाकीटातच स्वीकारण्यात येतील.
3. दरपत्रक सादर करण्याची अंतिम तारीख दि. २७.०४.२०२३ असून त्यानंतर मिळालेले दरपत्रक स्वीकारल्या जाणार नाहीत.
4. पशुखाद्य विभागावरील दुग्धशाळेमध्ये पोच द्यावे लागेल.
5. दरपत्रक पाठवितांना नमूद केलेले दर हे सर्व करांसहित नमूद करावे व सदर दर किमान सहा महिन्यांकरिता बंधनकारक राहतील.
6. पशुखाद्याची गुणवत्ता माणकानुसार असणे गरजेचे राहील.
7. सदर पशुखाद्य दुधाळ जनावरांकरिता उपयोगात आणले जाणार असून त्यानुसारच पशुखाद्याची गुणवत्ता असावी.
8. पुरवठा केलेल्या पशुखाद्याचे विपरीत परिणाम जाणवल्यास (दूध कमी होणे, पशुखाद्य न खाणे, ई.) त्वरित पशुखाद्य खरेदी बंद करण्यात येईल, तसेच शिल्लक असलेले पशुखाद्य परत करण्यात येईल.
9. पशुखाद्याचे देयक पुरवठा केल्यानंतर सर्व कार्यालयीन प्रक्रियेनंतरच काढण्यात येईल.

विभाग प्रमुख
पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला